| Published Date: | 7 Sep 2018 | Publication: | Nav Rashtra (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Nagpur | Page No: | 5 |
| MAV/CCM: | 5317.2/12.66 | Circulation: | 10000 |

# संचित व अर्चितला टीसीएस आयटी विझमध्ये यश



**नागपूर.** टीसीएस आयटी विझ, या भारतातील सर्वात मोठ्या आंतरशालेय क्विझ स्पर्धेचे टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)तर्फे आयोजन करण्यात येते. टीसीएस ही अग्रणीची आयटी सेवा, समुपदेशन आणि व्यावसायिक उपाययोजना देणारी कंपनी आहे. कंपनीतर्फे 4 सप्टेंबरला डॉ. वसंतराव देशपांडे हॉल, एमएलए हॉस्टेल समोर, सिव्हिल लाईन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत तब्बल 850 पेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

आठवी ते बारावीमधील विद्यार्थ्यांसाठी दमदार लढतीची ही स्पर्धा माहितीचा साठा देणारी आहे. टीसीएस आयटी विझमध्ये यंदा तांत्रिक ट्रेंडचा समावेश करण्यात आला आहे, तसेच ॲनिमेटेड सॉफ्टवेअर वापरून गंमतीदार फेऱ्या घेण्यात आल्या, यामुळे प्रेक्षक आणि टीममध्ये उत्सुकता ताणली गेली होती. यात मास पर्सन्लायझेशन, लिव्हर्जिंग इकोसिस्टम, क्रिएटिंग एक्सपोनेन्शल व्हॅल्यू आणि एम्ब्रेसिंग रिस्क अशा पाच फेऱ्या घेण्यात आल्या होत्या. स्पर्धेतील सर्वोत्तम सहा टीम प्रादेशिक अंतिम फेऱ्यांमधील लिखित प्राथमिक फेरीसाठी पात्र ठरल्या होत्या. प्रादेशिक अंतिम फेरीमध्ये पाच फेऱ्या झाल्यावर संचित खेडकर आणि अर्चित वेणुगोपालन ने सेंटर पॉइंट स्कूल,वर्धमान नगर,नागपूर कडून ही स्पर्धा जिंकली.

यावर्षीच्या प्रादेशिक चॅम्पिअन्सनी तब्बल 60,000 रुपयांचे गिफ्ट व्हाउचर्स मिळवले. तर जीएच रायसोनी,नागपूर मधील देव अशर आणि गौरव सिंग द्वारे सादर करण्यात आलेल्या उत्तेजनार्थ पारितोषिक विजेत्यांनी 40,000 रुपये मूल्यांची गिफ्ट व्हाउचर्स पटकावली. नागपूरमधील विजेते राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीसाठी प्रतिनिधित्व करतील.